नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 18/08/2020 (मंगळवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर पवनी चिधाई माता मंदिर समोर एन.एच. 44 हायवे रोड येथे दिनांक 16/08/2020 चे 23.40 वा. ते 00.30 वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ पो. स्टे. समोरील एनएच–44 रोडवर नाकाबंदी करुन एम. एच.– 04/ ईस – 7595 क्रमांकाच्या झायलो गाडीला थांबवले असता सदर वाहन चालकाने गाडी न थांबवता नागपूरच्या दिशेने पळु लागला. त्याचा पाठलाग करून पकडले असता सदर एम. एच.– 04/ ईस – 7595 क्रमांकाच्या झायलो गाडीची तपासनी केली असता गाडीमध्ये आरोपी नामे– करण जितेन्द्र भावे, वय 25 वर्ष, रा. ह. मु. ड्रगन पॅलेस जवळ कामठी व 2) शाहीद खान वजीद पठान, वय 32 वर्ष, रा. डोंगरताल यांच्या ताब्यातुन 6(बैल, गोरे) जनावरांची निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन जनावरे व वाहनासह एकुण किंमती 5,10,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. मिथीलेश पांडे, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(क)(उ) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणि संरक्षण, तसेच कलम 34 भादवी, सहकलम 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पुंजरवाड हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर